Exh.01

# विद्यमान दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, गंगाखेड यांचे न्यायालयात

दिवाणी दावा क्रमांक /2025

वादी : **गंगाबाई भ्र.रामजी कुंडगीर**
वय : 72 वर्षे, व्यवसाय : घरकाम व शेती
रा.बोथी ता.गंगाखेड जि.परभणी
मो.क्र.9767511811

**विरुध्द**

प्रतिवादी : 1] **प्रकाश पिता गोपाळराव पुराणिक**
वय : 65 वर्षे, व्यवसाय : सेवानिवृत्त व शेती
रा.राणीसावरगांव ता.गंगाखेड जि.परभणी

2] **कल्याण पिता प्रकाश पुराणिक**
वय : 37 वर्षे, व्यवसाय :शेती
रा.राणीसावरगांव ता.गंगाखेड जि.परभणी

3] **सतीश पिता सदाशिवराव पुराणिक**
वय : 40 वर्षे, व्यवसाय :शेती
रा.राणीसावरगांव ता.गंगाखेड जि.परभणी

4] **सदाशिव पिता सतीश पुराणिक**
वय : अज्ञान, अ.पा.क.सख्खी आई
**शारदा भ्र.सतीश पुराणिक**
वय : 35 वर्षे, धंदा : घरकाम
रा.राणीसावरगांव ता.गंगाखेड जि.परभणी

वाद : 1] घोषणा करणे बाबत की, वादी हे खालील वर्णनातील शेत मिळकतीचे मालक व ताबेदार असल्याबाबत.

**मिळकतीचे वर्णन :**

मौजे राणीसावरगांव ता.गंगाखेड जि.परभणी येथील शेत गट नं.218, एकुण क्षेत्रफळ 04 हे. 18 आर. आकार 10 रु.58 पैसे पैकी वादीच्या मालकी व ताब्यातील क्षेत्रफळ 80 आर ज्याची चतु:सिमा

पुर्वेस : सरकारी रस्ता

पश्चिमेस : प्रकाश पुराणिक यांची उर्वरित जमीन

दक्षिणेस : नाला व जुना रोड

उत्तरेस : प्रकाश पुराणिक यांची उर्वरित जमीन

2] घोषणा करणे बाबत की, प्रतिवादी क्र.1 व प्रतिवादी क्र.3 यांच्यामध्ये दिवाणी दावा क्र.218/2016 अन्वये दावा मिळकतीच्या हद्दीपर्यंत झालेली तडजोड ही वादींच्या हक्क व अधिकारांवर बंधनकारक नसून ती चुकीची व बेकायदेशीर असल्याचे घोषीत करणे.

3] घोषणा करणे बाबत की, प्रतिवादी क्र.3 व 4 यांच्यामध्ये दिवाणी दावा क्र.48/2022 अन्वये दावा मिळकतीच्या हद्दीपर्यंत झालेली तडजोड ही वादींच्या हक्क व अधिकारांवर बंधनकारक नसून ती चुकीची व बेकायदेशीर असल्याचे घोषीत करणे.

4] शाश्वत स्वरुपाचा मनाई हुकुमाचा आदेश पारित करण्यात यावा की, प्रतिवादी वा त्यांच्या वतीने इतर कुणीही वादींच्या मालकी व ताब्यातील वाद क्र.1 मधील वर्णनातील मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारे अडीहरकत व हस्तक्षेप करु नये. तसेच प्रतिवादींनी दावा मिळकतीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण, विक्री, डिक्री व इतर कोणत्याही प्रकारे त्रयस्थ

व्यक्तीचे हक्क व अधिकार कोणत्याही प्रकारे दावा मिळकतीमध्ये निर्माण करु नये.

**महोदय**,

वादी तिचा दावा खालील प्रमाणे सादर करते की,

1] हे की, वादी ही मुळची मौजे बोथी ता.गंगाखेड येथील रहिवासी असून शेतीची वहिती करुन उपजिवीका चालविते. वादी ही वयोवृध्द झालेली असल्याकारणाने ती इतर नोकर, मोलमजुर यांच्या मदतीने प्रत्यक्षपणे शेतीची व पर्यायाने दावा मिळकतीची वहिती करते. प्रतिवादी हे राणीसावरगांव येथील रहिवासी असून ते अत्यंत धुर्त व हुशार व्यक्ती आहेत. प्रतिवादी हे शेती काम तसेच पुरोहित काम करतात.

2] हे की, सन 2009 मध्ये प्रतिवादी क्र.1 यांना त्यांच्या कौटुंबिक गरजेकरिता दावा मिळकतीची विक्री करावयाची होती. त्यावेळी प्रतिवादी क्र.1 यांनी वादींशी संपर्क साधत मौजे राणीसावरगाव येथील गट नं.218 मधील 80 आर शेत मिळकत खरेदी करण्याबाबत विचारणा केली. सदरील मिळकतीस या नंतर सोयीकरिता दावा मिळकत असे संबोधण्यात येईल. वादी यांना देखील मिळकत खरेदी करण्यामध्ये स्वारस्य असल्याकारणाने वादी व प्रतिवादी क्र.1 यांच्यामध्ये दावा मिळकतीच्या खरेदी करण्याबाबत अंतिम ठराव झाला ज्यानुसार प्रतिवादी क्र.1 यांनी दावा मिळकतीचे दि.25/03/2009 रोजी वादी यांच्या हक्कात खरेदीखत क्र.572/2009 अन्वये योग्य तो मोबदला रक्कम

स्विकारुन विक्री केली. खरेदीच्या दिनांकापासून वादी या नमुद दावा मिळकतीच्या मालक व ताबेदार आहेत.

3] हे की, नोंदणीकृत खरेदीखताच्या आधारे वादी यांच्या नावाने महसुल अभिलेखामध्ये फेरफार क्र.2151 हा देखील मंजूर झालेला आहे. वादी या खरेदीच्या दिनांकापासून नमुद दावा मिळकतीची मालक व ताबेदार म्हणून वापर व उपभोग घेत आहे.

4] हे की, प्रतिवादी क्र.1 यांनी वादीस दावा मिळकतीची विक्री केल्यानंतर स्वार्थापोटी व वाईट हेतूने प्रतिवादी क्र.1 यांनी वादी विरुध्द कार्यवाही करण्यास सुरुवात केली. वादीच्या कुटुंबातील सदस्य हे शासकीय नोकरीस व सामाजिक व शैक्षणिक संस्था चालवित असलेल्या बाबीचा ऊहापोह करत प्रतिवादी क्र.1 यांनी खोटे, चुकीचे व बनावटी आरोप वयोवृध्द अशा वादींवर करत मिळकत हडपण्यासाठी अतोनात असे प्रयत्न केले. वादींनी त्यास कोणत्याही प्रकारे दाद न दिल्याच्या कारणाने प्रतिवादी क्र.1 यांनी स्वत:च्या व कुटुंबियांच्या मदतीने अनेक प्रकारच्या न्यायालयीन व महसुली कार्यवाह्या वादी व तिच्या कुटुंबियांविरुध्द केलेल्या आहेत. प्रतिवादींनी केलेल्या सर्व कार्यवाह्या या तथ्यहीन, खोट्या व बनावटी स्वरुपाच्या असून त्या आधारे प्रतिवादींचा अप्रामाणिक हेतु की, येनकेन प्रकारे दावा मिळकत बळकावणे हाच आहे. वादीने दावा मिळकत खरेदी करत असताना प्रतिवादी क्र.1 सोबत केवळ आणि केवळ योग्य तो मोबदला देऊन खरेदी विक्रीचा व्यवहार केलेला असताना प्रतिवादी जाणीवपुर्वकपणे सदरच्या खरेदी विक्री व्यवहारस वेगवेगळया स्वरुपाचे बनावटी वळणे देत आहेत.

प्रतिवादी क्र.1 व 2 यांनी वादी यांच्या विरुध्द दाखल केलेल्या वेगवेगळया दिवाणी व महसुली कार्यवाह्या बाबत सविस्तर तपशील वादी खालील मुद्यामध्ये कथन करत आहेत.

**दिवाणी व महसुली प्रकरणे**

I] प्रतिवादी क्र.1 व 2 यांनी सुरुवातीला वादी व तिच्या कुटुंबातील सदस्य व इतर यांच्या विरुध्द दिवाणी दावा क्र.06/2013 दावा मिळकतीच्या अनुषंगाने दाखल केला. वास्तविक पाहता सदरील दावा मिळकतीशी सदरील दाव्यातील इतर प्रतिवादींचा कोणत्याही प्रकारचा हक्क संबंध नव्हता फक्त दाव्याला रंगीन वळण देण्याकरिता प्रतिवादी क्र.1 व 2 यांनी वादींच्या कुटुंबियांना सदरील दाव्यामध्ये शरीक केले. सदरील दाव्यामध्ये वादी ही वयोवृध्द असून तिच्या वकिल साहेबांमार्फत लेखी जबाब दाखल करण्याकरिता विलंब झालेल्या बाबीचा गैरफायदा घेत प्रतिवादी क्र.1 व 2 यांनी फसवणुकीने तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज मंजूर करुन घेतला.

II] तद्नंतर प्रतिवादी क्र.1 यांनी वादी यांच्या विरुध्द त्यांच्या नावाने मंजूर असलेला फेरफार क्र.2151 रद्द करण्याकरिता मा.उपविभागीय अधिकारी, गंगाखेड यांच्या कार्यालयात प्रकरण क्र.2014/आरओआर/45 दाखल केले. सदरील न्यायालयाने विलंबाबाबत कोणतेही निरीक्षण न नोंदविता वादी यांचा फेरफार क्र.2151 चुकीच्या पध्दतीने रद्द केला.

III] तद्नंतर वादी यांनी मा.उपविभागीय अधिकारी, गंगाखेड यांच्या दि.28/12/2015 रोजीच्या आदेशाविरुध्द मा.अतिरिक्त

जिल्हाधिकारी, परभणी यांचे न्यायालयात अपिल क्रमांक 2016/आरओआर/94 दाखल केले. संबंधित न्यायालयाने वादी यांचे अपिल मंजूर करत प्रकरण परत उपविभागीय अधिकारी, गंगाखेड यांचेकडे विलंब माफीच्या अर्जावर निर्णयाकरिता परत पाठविले.

IV] तद्नंतर प्रतिवादी क्र.1 यांनी अपर जिल्हाधिकारी, परभणी यांच्या दि.23/05/2017 रोजीच्या आदेशा विरुध्द मा.अपर आयुक्त, औरंगाबाद यांच्या कार्यालयामध्ये रिवीजन क्रमांक 2017/264 दाखल केले ज्यामध्ये दि.10/04/2019 रोजी आदेश पारीत करुन मा.आयुक्त यांनी अपर जिल्हाधिकारी, परभणी यांचा आदेश कायम करत रिवीजन खारीज केले.

V] तद्नंतर मा.अपर जिल्हाधिकारी, परभणी यांचा आदेश कायम राहिल्याच्या कारणाने प्रकरण परत मा.उपविभागीय अधिकारी, गंगाखेड यांचे न्यायालयात अपिल क्र.2020/ आरओआर/ 2024 अन्वये नोंदविण्यात आले. ज्यामध्ये दि.26/02/2021 रोजी मा.उपविभागीय अधिकारी, गंगाखेड यांनी आदेश पारीत करत प्रतिवादी क्र.1 यांचे अपिल मंजूर करत वादी यांचा फेरफार क्र.2151 रद्द केला.

VI] तद्नंतर वादी यांनी दि.26/02/2021 रोजीच्या आदेशाविरुध्द मा.अपर जिल्हाधिकारी, परभणी यांच्या न्यायालयात अपिल क्र.2021/आरओआर/21 दि.22/03/2021 रोजी दाखल केले. सदर अपिल मा.अपर जिल्हाधिकारी, परभणी यांनी दि.28/03/2021 रोजी खारीज करत फेरफार क्र.2151 रद्दचा आदेश कायम ठेवला.

VII] तद्नंतर वादी यांनी अपर जिल्हाधिकारी, परभणी यांच्या दि.28/03/2022 रोजीच्या आदेशाविरुध्द मा.अपर आयुक्त, औरंगाबाद यांचे न्यायालयात रिवीजन क्र.168/2022 दि.22/04/2022 रोजी दाखल केले. वादी यांनी दाखल केलेले रिवीजन संबंधित न्यायालयाने दि.10/08/2022 रोजी मंजूर करत वादी यांचा फेरफार क्र.2151 कायम ठेवला तसेच प्रतिवादी क्र.1 यांनी बनावटीपणे महसुल व दिवाणी न्यायालयात वाद न्यायप्रविष्ट असताना प्रतिवादी क्र.3 यांच्या नावाने खोट्या डिक्री आधारे केलेला फेरफार क्र.2779 हा देखील महसुल आयुक्त यांनी रद्द केला.

VIII] मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या दि.10/08/2022 रोजीच्या आदेशानुसार तलाठी राणीसावरगांव यांनी आदेशाचे योग्य ते पालन करत वादींच्या नावाने पुर्वी मंजूर असलेला फेरफार क्र.2151 कायम करण्याच्या अनुषंगाने फेरफार क्र.3704 हा नोंदविला व तो महसुल अधिकारी यांनी दि.20/04/2023 रोजी मंजूर केला.

IX] मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या दि.10/08/2022 रोजीच्या आदेशाविरुध्द प्रतिवादी क्र.1 यांनी मा.महसुल मंत्री, मंत्रालय, मुंबई यांच्या न्यायालयात द्वितीय रिवीजन दाखल केले ते सध्या न्यायप्रविष्ट आहे. सदरील प्रकरणामध्ये कोणत्याही प्रकारचा स्थगिती आदेश विभागीय आयुक्त यांच्या आदेशास आज रोजी पर्यंत दिलेला नाही.

X] वादी यांच्या नावाने मंजूर फेरफार क्र.3704 या विरुध्द परत प्रतिवादी क्र.1 यांचा नातू व प्रतिवादी क्र.3 यांचा मुलगा यांनी मा.उपविभागीय अधिकारी, गंगाखेड यांचे समक्ष परत नव्याने अपिल क्र.2023/आरओआर/406 दि.09/02/2023 रोजी दाखल झाले. सदरील प्रकरणामध्ये वादी यांनी उपस्थित राहुन वरिल सर्व बाबीचा ऊहापोह करुन देखील उपविभागीय अधिकारी यांनी दि.27/02/2025 रोजी आदेश पारीत करत करत वादी यांच्या नावाने मंजूर फेरफार क्र.3704 रद्द केला.

XI] वादी यांनी सदरच्या आदेशाच्या नाराजीने मा.अपर जिल्हाधिकारी, परभणी यांचे न्यायालयात प्रकरण क्रमांक 2024/आरओआर/33 दि.20/03/2025 रोजी दाखल केलेले असून ते न्यायप्रविष्ट आहे. सदरील अपिल प्रकरणामध्ये वादी यांनी मा.उपविभागीय अधिकारी, गंगाखेड यांच्या दि.27/02/2025 रोजीच्या आदेशास स्थगितीची मागणी केली असता सदरील न्यायालयाने स्थगिती अर्ज नाकारला. त्याविरुध्द वादी यांनी मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या न्यायालयात अपिल दाखल केलेले असून ते न्यायप्रविष्ट आहे.

5] हे की, महसुल न्यायालयामध्ये वादी व प्रतिवादी क्र.1 यांच्यामध्ये फेरफार बाबत वाद न्यायप्रविष्ट असताना तसेच प्रतिवादी क्र.1 व 2 यांनी वादी यांच्या विरुध्द दाखल केलेला दावा क्र.06/2013 न्यायप्रविष्ट असताना प्रतिवादी क्र.1 ते 4 यांनी अत्यंत धुर्तपणे व चाणाक्षपणे न्यायालयाची फसवणुक करुन केवळ प्रकरणामध्ये गुंतागुंत निर्माण करण्याकरिता व कागदोपत्री पुरावा

तयार करण्याकरिता न्यायालयासोबतच फ्रॉड करुन प्रतिवादींनी स्वत:च्या कुटुंबियांच्या नावाने वेगवेगळया प्रकारच्या बनावटी, खोट्या व लबाडीने डिक्री हस्तगत केलेली आहे. वास्तविक पाहता अशा डिक्रीला कायद्यामध्ये कोणतेही महत्व नाही. तरी देखील महसुल न्यायालय मात्र सदरील आदेश हे दिवाणी न्यायालयाचे असल्याकारणाने त्यास अंतिम मानून त्या आदेशाच्या प्रभावाखाली वादी यांच्या प्रकरणातील गुणवत्तेवर कोणत्याही प्रकारे सारासार विचार करत नसून दिवाणी न्यायालयाच्या नावाखाली मनमानी प्रकरणाने महसुल प्राधिकरण आदेश पारित करत आहेत.

6] हे की, प्रतिवादींनी आपसातील संगणमताने बनावटी व फ्रॉड करुन हस्तगत केलेल्या डिक्री बाबत तपशील की, प्रतिवादी क्र.3 जे की त्यांच्या दिवाणी दावा क्र.218/2016 मधील कथनामध्ये असे कथन करतात की, तो प्रतिवादी क्र.1 यांचा सख्खा मुलगा असून त्यांना प्रतिवादी क्र.1 यांचे भाऊ सदाशिव यांनी दत्तक घेतलेले होते. अशा दत्तक गेलेल्या मुलाने प्रतिवादी क्र.1 यांच्या विरुध्द वाटणी करिता दिवाणी न्यायालयामध्ये दावा दाखल केला. सदरचा दावा हा दि.19/09/2016 रोजी दाखल करण्यात आला. सदरचा दावा प्रतिवादी क्र.3 यांनी त्यांच्याच कुटुंबातील आई, वडिल व भाऊ यांच्या विरुध्द दाखल केला. विशेषत: सदरचा दावा हा लगेच दि.15/10/2016 रोजी म्हणजे एक महिन्यापेक्षा कमी कालावधीमध्ये तडजोडी अंती संपुष्टात आणण्यात आला. विशेषत: दावा मिळकत जी वादी यांच्या मालकी व ताब्यात आहे त्यांना सदरच्या प्रकरणामध्ये पक्षकार देखील करण्यात आलेले नाही. त्या कारणाने

सदरचा हुकुमनामा हा वादींवर बंधनकारक नाही या करिता वादीने वाद प्रकरणामध्ये मागणी केलेली आहे. दावा क्र.218/2016 मध्ये तडजोड करत असताना प्रतिवादी क्र.1 व 2 यांना त्यांनी दाखल केलेल्या वादी विरुध्दच्या दावा क्र.06/2013 रोजी संपुर्ण माहिती होती. असे असताना प्रतिवादी क्र.1 व 2 यांनी सदरच्या तडजोडी मध्ये वादींच्या अस्तित्वाबाबत व दाव्याबाबत चकार शब्द देखील उल्लेख केलेला नाही व तडजोडी नुसार दावा मिळकत जी वादींची आहे ती प्रतिवादी क्र.3 यांच्या वाटणीस दिली असे कागदोपत्री दाखविले. विशेष बाब ही की, प्रतिवादी क्र.3 हे त्यांच्याच कथनानुसार दत्तक गेलेले असल्याकारणाने कायद्यानुसार त्यांना जन्मदात्याच्या मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार व संबंध राहत नाही. असे असताना दत्तक गेलेल्या पुत्रास प्रतिवादी क्र.1 यांनी दिलेली वाटणी ही बेकायदेशीर ठरते. वरिल सर्व उठाठेव करण्यामागील प्रतिवादींचा स्पष्टपणे हेतु की, वादींच्या मिळकती बाबत अधिकाधिक गुंतागुंत निर्माण करणे हाच होता. ज्यावेळी सदरची बनावटी तडजोड करण्यात आली त्यावेळी वादी व प्रतिवादी क्र.1 यांच्यामध्ये महसुल प्रकरणे न्यायप्रविष्ट होती.

7] हे की, प्रतिवादी हे वरिल प्रमाणे बनावटी डिक्री करुन थांबले नाही तर लगेच प्रतिवादींनी आपसातील संगणमताने प्रतिवादी क्र.3 यांचा मुलगा प्रतिवादी क्र.4 ज्याचे वय केवळ 08 महिने आहे यांच्या मार्फत व पत्नी मार्फत लगेच प्रतिवादी क्र.3 यांच्या विरुध्द वाटणी करिता दिवाणी दावा क्र.48/2022

दि.04/02/2022 रोजी दाखल केला. पुर्वीच्या दाव्याप्रमाणेच लगेच दि.12/03/2022 रोजी म्हणजे एक महिन्याच्या आतच पुनश्च दाव्यामध्ये बनावटी तडजोड आणून सदरचा दावा देखील संपुष्टात आणण्यात आला. सदरच्या दाव्यामध्ये सतिश पुराणिक यांनी दिवाणी दावा क्र.06/2013 याबाबत चकार शब्द देखील उल्लेख केलेला नाही जेव्हा की, ते सन 2017 मध्ये दावा क्र.06/2013 मध्ये त्यांच्याच अर्जानुसार शरीक झालेले होते. प्रतिवादी क्र.3 यांना महसुल प्रकरणे वादी व प्रतिवादी क्र.1 यांच्यामध्ये न्यायप्रविष्ट असल्याची बाब संपुर्णपणे माहिती होती.

8] हे की, प्रतिवादी क्र.4 जे की अज्ञान असून केवळ प्रकरणामध्ये गुंतागुंत निर्माण करण्याकरिता दुसरी बनावटी डिक्री प्रतिवादींनी संगणमत करुन व न्यायालयाची दिशाभूल करुन हस्तगत करुन घेतली. एका बाजूने प्रतिवादींनी वादींच्याच मालकी व ताब्यातील मिळकती बाबत कोर्ट डिक्रीवर कोर्ट डिक्री करुन घेत राहिले व दुसऱ्या बाजुने प्रतिवादी क्र.1 हे वादी विरुध्द दावा क्र.06/2013 अन्वये दावा न्यायालयात न्यायप्रविष्ट ठेवत राहिले. विशेषत: सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.1 यांनी वादी विरुध्द मिळकत हस्तांतरीत करु नये अशा प्रकारचा मनाई हुकुमाचा आदेश मिळविला उलटपक्षी मात्र प्रतिवादी क्र.1 हे स्वत:च त्यांचा दावा न्यायप्रविष्ट असताना त्याच मिळकतीचे वेगवेगळया कोर्ट डिक्रीआधारे हस्तांतरण करत आहेत जी बाब प्रतिवादींशी संगणमत व प्रतिवादींचा दुटप्पीपणा स्पष्टपणे अधोरेखित करते. विशेषत: प्रतिवादी क्र.1 ते 3 हे बिनधास्तपणे न्यायालयाची

फसवणुक करुन दिवाणी दावा क्र.06/2013 मध्ये साक्षीपुरावा देत आहेत व तत्पुर्ती तेच न्यायालयीन डिक्री आधारे मिळकत प्रतिवादी क्र.4 यांच्या वाटणी हिश्यास दिलेली आहे असे दर्शवित आहेत. त्याच प्रमाणे महसुल प्रकरणामध्ये देखील प्रतिवादी क्र.1 हे आज रोजी देखील वादींविरुध्द प्रकरणे चालवित आहेत. प्रतिवादींचेच कृत्य काल्पनिक स्वरुपात खरे आहे असे गृहित धरले तरी देखील त्यांनी जर न्यायालयीन डिक्री आधारे मिळकत हस्तांतरीत केली आहे अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्र.1 यांचे मिळकतीमध्ये कोणतेही हितसंबंध नसताना ते वादींविरुध्द महसुल प्रकरणे बिनधास्तपणे चालवित आहेत.

9] हे की, प्रतिवादी क्र.4 यांनी त्यांच्या हक्कात झालेल्या बनावटी डिक्रीचा फायदा घेत दुसऱ्या महसुली प्रकरणाच्या कार्यवाही (Second Round of Litigation) मध्ये सुरु केले ज्यामध्ये की, वादी यांच्या नावाने पहिल्या महसुली प्रकरणाच्या कार्यवाही (First Round of Litigation) मध्ये अंतिम आदेशानुसार झालेला फेरफार क्र.3704 हा प्रतिवादी क्र.4 यांनी दुसऱ्या महसुली प्रकरणाच्या कार्यवाही (Second Round of Litigation) मध्ये आव्हानीत केला व त्यामध्ये ते तात्पुरत्या स्वरुपामध्ये यशस्वी झाले. कारण की, महसुली न्यायालय हे निष्कारणपणे प्रतिवादींनी आपसातील संगणमताने हस्तगत केलेल्या तडजोडीच्या कोर्ट डिक्रीला प्रभावित होऊन वादींच्या प्रकरणातील गुणवत्तेला संपुर्णपणे दुर्लक्षित करत आहेत. महसुल प्राधिकरणे ही सारासार विचार देखील करत नाहीत की, सदरच्या कोर्ट डिक्रीमध्ये कुठेही वादी

यांना पक्षकार केलेले नाही. वादींच्या हक्कातील खरेदीखत आज रोजी पर्यंत कोणत्याही न्यायालयाने रद्द केलेले नाही. महसुल न्यायालय हे खोट्या व बनावटी डिक्रीच्या प्रभावाखाली येऊन वादींचे हक्क व अधिकार डावलत असल्याकारणाने वादींनी सदरची न्यायालयीन हुकुमनामे या दाव्या अन्वये आव्हानीत केलेले आहेत. तसेच त्या विरुध्द वादी हे अंतरिम स्वरुपातील मागणी देखील स्वतंत्र अर्जाद्वारे करित आहेत.

10] हे की, प्रतिवादींनी आपसातील संगणमताने प्रकरणामध्ये अधिकाधिक गुंतागुंत निर्माण करण्याच्या वाईट हेतुने सदरच्या बनावटी डिक्री मा.दिवाणी न्यायालयाची फसवणुक करुन हस्तगत केलेल्या आहेत. दिवाणी न्यायालयासमक्षच दावा मिळकती बाबत वाद न्यायप्रविष्ट आहे, दावा मिळकतीबाबत वाद महसुल न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट आहे, वादींच्या हक्कातील खरेदीखत प्रतिवादींनी आव्हानीत केलेले असून ते आज रोजीपर्यंत रद्द झालेले नाही ही बाब प्रतिवादींना स्पष्टपणे माहिती असताना देखील प्रतिवादींनी अल्प कालावधीमध्ये कुटुंबातील अंतर्गत संगमणमताने तडजोडी करुन बनावटी हुकुमनामे हस्तगत केलेले आहेत व सदरील हुकुमनाम्यामध्ये वादी हे पक्षकार नाहीत तसेच ते वादींच्या परस्पर मुद्दामहुन करुन घेतलेले आहेत त्यामूळे ते वादींवर बंधनकारक नाहीत अशी धोषणा करणे आवश्यक आहे.

11] हे की, वादी हे दिवाणी दावा क्र.06/2013 मध्ये योग्यरित्या सहभाग घेत असताना तसेच त्यांच्या हक्कात महसुल आयुक्त यांनी आदेश पारीत केलेला असताना प्रतिवादींनी दावा मिळकती

बाबत गुंतागुंती करिता डिक्री मंजूर करुन घेतलेल्या असून त्याचा प्रभाव अनावश्यकपणे महसुल न्यायालयावर पडत आहेत त्याकारणाने वादींनी दावा मिळकती बाबत मालकीची घोषणा करुन मिळणे बाबत मागणी केलेली आहे.

12] हे की, प्रतिवादी क्र.1 व 2 यांनी सुरुवातीला वादी व इतरांविरुध्द दावा क्र.06/2013 दाखल केला व त्यामध्ये नंतर प्रतिवादी क्र.3 यांना वादी म्हणून समाविष्ट केले आज रोजी प्रतिवादी क्र.1 ते 3 यांना त्यांच्याच कथनानुसार कोणताही हक्क व अधिकार शिल्लक नाही त्याकारणाने सदरचा दावा Infructuous झालेला असल्याकारणाने तो खारीज करण्याकरिता वादी स्वतंत्र अर्ज देणार आहे. प्रतिवादी क्र.4 विरुध्द दावा चालविण्याची परवानगी मिळण्याकरिता वादी स्वतंत्र अर्ज दाव्यासोबत देत आहे.

13] हे की, वादी यांनी शेवटी सर्व प्रतिवादींना विनंती केली की, त्यांनी वादींची दावा मिळकतीवरील मालकी व ताबा खरेदीखताअन्वये कबुल करुन प्रतिवादींनी केलेल्या डिक्री रद्द समजाव्यात त्यास प्रतिवादींनी शेवटी दि.08/06/2025 रोजी इनकार केला.

14] हे की, दाव्याचे मुल्यांकन न्यायालयीन कार्यक्षेत्राकरिता व कोर्ट फिस करिता वाद क्र.1 करिता 2.53 x 200 = 506/- कोर्ट फिस करिता मुल्यांकन 2.53 x 80 = 202.4/- ज्या करिता कमीत कमी न्यायालयीन शुल्क रु. 200 /- आवश्यक आहे. तसेच वाद क्र.2 ते 4 करिता निश्चित मुल्यांकन प्रत्येकी रु.1000/- असे असून त्यावरील न्यायालयीन कोर्ट फिस रु. 600 /-

आवश्यक आहे. याप्रमाणे एकुण न्यायालयीन शुल्क रु.___800___/- अदा केलेले आहे जे योग्य व पुरेसे आहे.

15] हे की, वादी व प्रतिवादी हे मा.न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात राहत असून दावा मिळकत देखील मा.न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात आहे त्यामुळे मा.न्यायालयास दावा चालवून निर्णय देण्याचा पुर्ण अधिकार आहे.

16] हे की, वादीने मुदतीमध्ये दावा सादर केलेला आहे.

**तरी विनंती की,**

तरी विंनती की, वादीचा दावा खर्चासह मंजूर करण्यात यावा की,

1] घोषणा करणे बाबत की, वादी हे खालील वर्णनातील शेत मिळकतीचे मालक व ताबेदार असल्याबाबत.

**मिळकतीचे वर्णन** :

मौजे राणीसावरगांव ता.गंगाखेड जि.परभणी येथील शेत गट नं.218, एकुण क्षेत्रफळ 04 हे. 18 आर. आकार 10 रु.58 पैसे पैकी वादीच्या मालकी व ताब्यातील क्षेत्रफळ 80 आर ज्याची चतु:सिमा

पुर्वेस : सरकारी रस्ता

पश्चिमेस : प्रकाश पुराणिक यांची उर्वरित जमीन

दक्षिणेस : नाला व जुना रोड

उत्तरेस : प्रकाश पुराणिक यांची उर्वरित जमीन

2] घोषणा करणे बाबत की, प्रतिवादी क्र.1 व प्रतिवादी क्र.3 यांच्यामध्ये दिवाणी दावा क्र.218/2016 अन्वये दावा मिळकतीच्या हद्दीपर्यंत झालेली तडजोड ही वादींच्या हक्क व अधिकारांवर बंधनकारक नसून ती चुकीची व बेकायदेशीर असल्याचे घोषीत करणे.

3] घोषणा करणे बाबत की, प्रतिवादी क्र.3 व 4 यांच्यामध्ये दिवाणी दावा क्र.48/2022 अन्वये दावा मिळकतीच्या हद्दीपर्यंत झालेली तडजोड ही वादींच्या हक्क व अधिकारांवर बंधनकारक नसून ती चुकीची व बेकायदेशीर असल्याचे घोषीत करणे.

4] शाश्वत स्वरुपाचा मनाई हुकुमाचा आदेश पारित करण्यात यावा की, प्रतिवादी वा त्यांच्या वतीने इतर कुणीही वादींच्या मालकी व ताब्यातील वाद क्र.1 मधील वर्णनातील मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारे अडीहरकत व हस्तक्षेप करु नये. तसेच प्रतिवादींनी दावा मिळकतीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण, विक्री, डिक्री व इतर कोणत्याही प्रकारे त्रयस्थ व्यक्तीचे हक्क व अधिकार कोणत्याही प्रकारे दावा मिळकतीमध्ये निर्माण करु नये.

दिनांक : 24-6-25

वादी

नि.डा.अं

**गंगाबाई भ्र.रामजी कुंडगीर**
रा.बोथी ता.गंगाखेड जि.परभणी

**सत्यापन**

सत्यापित करण्यात येते की, उपरोक्त दाव्यातील मजकूर हा माझ्या माहिती व ज्ञानाप्रमाणे सत्य व बरोबर आहे, करिता आज रोजी परभणी येथे सत्यापित करण्यात येत आहे.

दिनांक : 24-6-25

वादी

नि.डा.अं

**गंगाबाई भ्र.रामजी कुंडगीर**
रा.बोथी ता.गंगाखेड जि.परभणी

मार्फत

**ॲड.** [illegible]
परभणी

Noted & Registered
at Serial Number..... 644/25
Date: 24/6/25

Exh.06

ORDER
Seen & filed.
Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.06.25 17:39:58 +0530
CJSD, Gangakhed.

# विद्यमान दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, गंगाखे [redacted]
# न्यायालयात

दिवाणी दावा क्रमांक /2025

**गंगाबाई भ्र.रामजी कुंडगीर**

**विरुध्द**

**प्रकाश पिता गोपाळराव पुराणिक व इतर** [redacted]

वाद : तात्पुरता मनाई हुकुमाकरिता.

**शपथपत्र**

मी, **गंगाबाई भ्र.रामजी कुंडगीर**, वय : 72 वर्षे, व्यवसाय : घरकाम व शेती, रा.बोथी ता.गंगाखेड जि.परभणी शपथपुर्वक निवेदन सादर करते की,

हे की, निवेदिकेने प्रतिवादी विरुध्द घोषणा करणे बाबत व मनाई हुकुमा करिता दावा सादर केलेला आहे.

हे की, निवेदिकेने दाखल केलेल्या दाव्यातील मजकूर हा या शपथपत्राचा भाग समजण्यात यावा.

हे की, निवेदिकेने दाखल केलेल्या दाव्यातील मजकूर हा सत्य व बरोबर आहे.

करिता हे शपथपत्र.

दिनांक : 24-6-25

निवेदिका
नि.डा.अं

**गंगाबाई भ्र.रामजी कुंडगीर**
रा.बोथी ता.गंगाखेड जि.परभणी
**EXECUTANT**

**सत्यापन**

सत्यापित करण्यात येते की, उपरोक्त शपथपत्रातील मजकूर हा माझ्या माहिती व ज्ञानाप्रमाणे सत्य व बरोबर आहे, करिता आज रोजी परभणी येथे सत्यापित करण्यात येत आहे.

दिनांक : 24-6-25

निवेदिका
नि.डा.अं

**गंगाबाई भ्र.रामजी कुंडगीर**
रा.बोथी ता.गंगाखेड जि.परभणी
**EXECUTANT**

NOTARY SEAL
R. M. GHULE
Area Parbhani District
Reg.No.31467
Exp. Dt. 09/01/2030
GOVERNMENT OF INDIA
NOTARIAL

NOTARY * INDIA * GOVERNMENT OF INDIA
SEAL
R. M. GHULE
Area Parbhani
District
Reg.No.31467
Exp. Dt.
09/01/2030

**AFFIDAVIT**

Sworn before me on the 24 day of 1/2025
by [handwritten name]
Who has been identified by Adv. S. M. Patale
Who is Personally by Known to me & Whose
Signature here to appended.

**EXECUTANT**

***BEFORE ME***

**R. M. GHULE**
ADVOCATE & NOTARY
(Appointed by Govt. of India)
Parbhani

***IDENTIFIED***

**Noted & Registered**
**at Serial Number.** 644/25
**Date:** 24/1/2025

Exh.05

# विद्यमान दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, गंगाखेड यांचे न्यायालयात

दिवाणी दावा क्रमांक /2025

वादी : **गंगाबाई भ्र.रामजी कुंडगीर**
वय : 72 वर्षे, व्यवसाय : घरकाम व शेती
रा.बोथी ता.गंगाखेड जि.परभणी
मो.क्र.9767511811

## विरुध्द

प्रतिवादी : 1] **प्रकाश पिता गोपाळराव पुराणिक**
वय : 65 वर्षे, व्यवसाय : सेवानिवृत्त व शेती
रा.राणीसावरगांव ता.गंगाखेड जि.परभणी

2] **कल्याण पिता प्रकाश पुराणिक**
वय : 37 वर्षे, व्यवसाय :शेती
रा.राणीसावरगांव ता.गंगाखेड जि.परभणी

3] **सतीश पिता सदाशिवराव पुराणिक**
वय : 40 वर्षे, व्यवसाय :शेती
रा.राणीसावरगांव ता.गंगाखेड जि.परभणी

4] **सदाशिव पिता सतीश पुराणिक**
वय : अज्ञान, अ.पा.क.सरख्वी आई
**शारदा भ्र.सतीश पुराणिक**
वय : 35 वर्षे, धंदा : घरकाम
रा.राणीसावरगांव ता.गंगाखेड जि.परभणी

वाद : तात्पुरता मनाई हुकुमाकरिता.

**महोदय,**

वादी तिचा अंतरिम स्वरुपाचा तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज ऑर्डर 39, रुल 1 व 2 सह कलम 151 दिवाणी प्रक्रीया संहिता अन्वये खालील प्रमाणे सादर करते की,

1] हे की, वादीने प्रतिवादी विरुध्द घोषणा करणे बाबत व मनाई हुकुमा करिता दावा सादर केलेला आहे.

2] हे की, वादीने दाखल केलेल्या दाव्यातील मजकूर हा या अर्जाचा भाग समजण्यात यावा.

3] हे की, वादी ही मुळची मौजे बोथी ता.गंगाखेड येथील रहिवासी असून शेतीची वहिती करुन उपजिवीका चालविते. वादी ही वयोवृध्द झालेली असल्याकारणाने ती इतर नोकर, मोलमजुर यांच्या मदतीने प्रत्यक्षपणे शेतीची व पर्यायाने दावा मिळकतीची वहिती करते. प्रतिवादी हे राणीसावरगांव येथील रहिवासी असून ते अत्यंत धुर्त व हुशार व्यक्ती आहेत. प्रतिवादी हे शेती काम तसेच पुरोहित काम करतात.

4] हे की, सन 2009 मध्ये प्रतिवादी क्र.1 यांना त्यांच्या कौटुंबिक गरजेकरिता दावा मिळकतीची विक्री करावयाची होती. त्यावेळी प्रतिवादी क्र.1 यांनी वादींशी संपर्क साधत मौजे राणीसावरगाव येथील गट नं.218 मधील 80 आर शेत मिळकत खरेदी करण्याबाबत विचारणा केली. सदरील मिळकतीस या नंतर सोयीकरिता दावा मिळकत असे संबोधण्यात येईल. वादी यांना देखील मिळकत खरेदी करण्यामध्ये स्वारस्य असल्याकारणाने वादी व प्रतिवादी क्र.1 यांच्यामध्ये दावा मिळकतीच्या खरेदी करण्याबाबत अंतिम ठराव झाला ज्यानुसार प्रतिवादी क्र.1 यांनी

दावा मिळकतीचे दि.25/03/2009 रोजी वादी यांच्या हक्कात खरेदीखत क्र.572/2009 अन्वये योग्य तो मोबदला रक्कम स्विकारुन विक्री केली. खरेदीच्या दिनांकापासून वादी या नमुद दावा मिळकतीच्या मालक व ताबेदार आहेत.

5] हे की, नोंदणीकृत खरेदीखताच्या आधारे वादी यांच्या नावाने महसुल अभिलेखामध्ये फेरफार क्र.2151 हा देखील मंजूर झालेला आहे. वादी या खरेदीच्या दिनांकापासून नमुद दावा मिळकतीची मालक व ताबेदार म्हणून वापर व उपभोग घेत आहे.

6] हे की, प्रतिवादी क्र.1 यांनी वादीस दावा मिळकतीची विक्री केल्यानंतर स्वार्थापोटी व वाईट हेतूने प्रतिवादी क्र.1 यांनी वादी विरुध्द कार्यवाही करण्यास सुरुवात केली. वादीच्या कुटुंबातील सदस्य हे शासकीय नोकरीस व सामाजिक व शैक्षणिक संस्था चालवित असलेल्या बाबीचा ऊहापोह करत प्रतिवादी क्र.1 यांनी खोटे, चुकीचे व बनावटी आरोप वयोवृध्द अशा वादींवर करत मिळकत हडपण्यासाठी अतोनात असे प्रयत्न केले. वादींनी त्यास कोणत्याही प्रकारे दाद न दिल्याच्या कारणाने प्रतिवादी क्र.1 यांनी स्वतःच्या व कुटुंबियांच्या मदतीने अनेक प्रकारच्या न्यायालयीन व महसुली कार्यवाह्या वादी व तिच्या कुटुंबियांविरुध्द केलेल्या आहेत. प्रतिवादींनी केलेल्या सर्व कार्यवाह्या या तथ्यहीन, खोट्या व बनावटी स्वरुपाच्या असून त्या आधारे प्रतिवादींचा अप्रामाणिक हेतु की, येनकेन प्रकारे दावा मिळकत बळकावणे हाच आहे. वादीने दावा मिळकत खरेदी करत असताना प्रतिवादी क्र.1 सोबत केवळ आणि केवळ योग्य तो मोबदला देऊन खरेदी विक्रीचा व्यवहार

केलेला असताना प्रतिवादी जाणीवपुर्वकपणे सदरच्या खरेदी विक्री व्यवहारस वेगवेगळया स्वरुपाचे बनावटी वळणे देत आहेत. प्रतिवादी क्र.1 व 2 यांनी वादी यांच्या विरुध्द दाखल केलेल्या वेगवेगळ्या दिवाणी व महसुली कार्यवाह्या बाबत सविस्तर तपशील वादीने मुख्य दाव्यामध्ये कथन केलेला आहे.

7] हे की, महसुल न्यायालयामध्ये वादी व प्रतिवादी क्र.1 यांच्यामध्ये फेरफार बाबत वाद न्यायप्रविष्ट असताना तसेच प्रतिवादी क्र.1 व 2 यांनी वादी यांच्या विरुध्द दाखल केलेला दावा क्र.06/2013 न्यायप्रविष्ट असताना प्रतिवादी क्र.1 ते 4 यांनी अत्यंत धुर्तपणे व चाणाक्षपणे न्यायालयाची फसवणुक करुन केवळ प्रकरणामध्ये गुंतागुंत निर्माण करण्याकरिता व कागदोपत्री पुरावा तयार करण्याकरिता न्यायालयासोबतच फ्रॉड करुन प्रतिवादींनी स्वत:च्या कुटुंबियांच्या नावाने वेगवेगळया प्रकारच्या बनावटी, खोट्या व लबाडीने डिक्री हस्तगत केलेली आहे. वास्तविक पाहता अशा डिक्रीला कायद्यामध्ये कोणतेही महत्व नाही. तरी देखील महसुल न्यायालय मात्र सदरील आदेश हे दिवाणी न्यायालयाचे असल्याकारणाने त्यास अंतिम मानून त्या आदेशाच्या प्रभावाखाली वादी यांच्या प्रकरणातील गुणवत्तेवर कोणत्याही प्रकारे सारासार विचार करत नसून दिवाणी न्यायालयाच्या नावाखाली मनमानी प्रकरणाने महसुल प्राधिकरण आदेश पारित करत आहेत.

8] हे की, प्रतिवादींनी आपसातील संगणमताने बनावटी व फ्रॉड करुन हस्तगत केलेल्या डिक्री बाबत तपशील की, प्रतिवादी क्र.3 जे की त्यांच्या दिवाणी दावा क्र.218/2016 मधील कथनामध्ये असे

कथन करतात की, तो प्रतिवादी क्र.1 यांचा सख्खा मुलगा असून त्यांना प्रतिवादी क्र.1 यांचे भाऊ सदाशिव यांनी दत्तक घेतलेले होते. अशा दत्तक गेलेल्या मुलाने प्रतिवादी क्र.1 यांच्या विरुध्द वाटणी करिता दिवाणी न्यायालयामध्ये दावा दाखल केला. सदरचा दावा हा दि.19/09/2016 रोजी दाखल करण्यात आला. सदरचा दावा प्रतिवादी क्र.3 यांनी त्यांच्याच कुटुंबातील आई, वडिल व भाऊ यांच्या विरुध्द दाखल केला. विशेषत: सदरचा दावा हा लगेच दि.15/10/2016 रोजी म्हणजे एक महिन्यापेक्षा कमी कालावधीमध्ये तडजोडी अंती संपुष्टात आणण्यात आला. विशेषत: दावा मिळकत जी वादी यांच्या मालकी व ताब्यात आहे त्यांना सदरच्या प्रकरणामध्ये पक्षकार देखील करण्यात आलेले नाही. त्या कारणाने सदरचा हुकुमनामा हा वादींवर बंधनकारक नाही या करिता वादीने वाद प्रकरणामध्ये मागणी केलेली आहे. दावा क्र.218/2016 मध्ये तडजोड करत असताना प्रतिवादी क्र.1 व 2 यांना त्यांनी दाखल केलेल्या वादी विरुध्दच्या दावा क्र.06/2013 रोजी संपुर्ण माहिती होती. असे असताना प्रतिवादी क्र.1 व 2 यांनी सदरच्या तडजोडी मध्ये वादींच्या अस्तित्वाबाबत व दाव्याबाबत चकार शब्द देखील उल्लेख केलेला नाही व तडजोडी नुसार दावा मिळकत जी वादींची आहे ती प्रतिवादी क्र.3 यांच्या वाटणीस दिली असे कागदोपत्री दाखविले. विशेष बाब ही की, प्रतिवादी क्र.3 हे त्यांच्याच कथनानुसार दत्तक गेलेले असल्याकारणाने कायद्यानुसार त्यांना जन्मदात्याच्या मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार व संबंध राहत नाही. असे असताना दत्तक गेलेल्या

पुत्रास प्रतिवादी क्र.1 यांनी दिलेली वाटणी ही बेकायदेशीर ठरते. वरिल सर्व उठाठेव करण्यामागील प्रतिवादींचा स्पष्टपणे हेतु की, वादींच्या मिळकती बाबत अधिकाधिक गुंतागुंत निर्माण करणे हाच होता. ज्यावेळी सदरची बनावटी तडजोड करण्यात आली त्यावेळी वादी व प्रतिवादी क्र.1 यांच्यामध्ये महसुल प्रकरणे न्यायप्रविष्ट होती.

9] हे की, प्रतिवादी हे वरिल प्रमाणे बनावटी डिक्री करुन थांबले नाही तर लगेच प्रतिवादींनी आपसातील संगणमताने प्रतिवादी क्र.3 यांचा मुलगा प्रतिवादी क्र.4 ज्याचे वय केवळ 08 महिने आहे यांच्या मार्फत व पत्नी मार्फत लगेच प्रतिवादी क्र.3 यांच्या विरुध्द वाटणी करिता दिवाणी दावा क्र.48/2022 दि.04/02/2022 रोजी दाखल केला. पुर्वीच्या दाव्याप्रमाणेच लगेच दि.12/03/2022 रोजी म्हणजे एक महिन्याच्या आतच पुनश्च दाव्यामध्ये बनावटी तडजोड आणून सदरचा दावा देखील संपुष्टात आणण्यात आला. सदरच्या दाव्यामध्ये सतिश पुराणिक यांनी दिवाणी दावा क्र.06/2013 याबाबत चकार शब्द देखील उल्लेख केलेला नाही जेव्हा की, ते सन 2017 मध्ये दावा क्र.06/2013 मध्ये त्यांच्याच अर्जानुसार शरीक झालेले होते. प्रतिवादी क्र.3 यांना महसुल प्रकरणे वादी व प्रतिवादी क्र.1 यांच्यामध्ये न्यायप्रविष्ट असल्याची बाब संपुर्णपणे माहिती होती.

10] हे की, प्रतिवादी क्र.4 जे की अज्ञान असून केवळ प्रकरणामध्ये गुंतागुंत निर्माण करण्याकरिता दुसरी बनावटी डिक्री प्रतिवादींनी संगणमत करुन व न्यायालयाची दिशाभूल करुन

हस्तगत करुन घेतली. एका बाजूने प्रतिवादींनी वादींच्याच मालकी व ताब्यातील मिळकती बाबत कोर्ट डिक्रीवर कोर्ट डिक्री करुन घेत राहिले व दुसऱ्या बाजुने प्रतिवादी क्र.1 हे वादी विरुध्द दावा क्र.06/2013 अन्वये दावा न्यायालयात न्यायप्रविष्ट ठेवत राहिले. विशेषत: सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.1 यांनी वादी विरुध्द मिळकत हस्तांतरीत करु नये अशा प्रकारचा मनाई हुकुमाचा आदेश मिळविला उलटपक्षी मात्र प्रतिवादी क्र.1 हे स्वत:च त्यांचा दावा न्यायप्रविष्ट असताना त्याच मिळकतीचे वेगवेगळया कोर्ट डिक्रीआधारे हस्तांतरण करत आहेत जी बाब प्रतिवादींशी संगणमत व प्रतिवादींचा दुटप्पीपणा स्पष्टपणे अधोरेखित करते. विशेषत: प्रतिवादी क्र.1 ते 3 हे बिनधास्तपणे न्यायालयाची फसवणुक करुन दिवाणी दावा क्र.06/2013 मध्ये साक्षीपुरावा देत आहेत व तत्पुर्वी तेच न्यायालयीन डिक्री आधारे मिळकत प्रतिवादी क्र.4 यांच्या वाटणी हिश्यास दिलेली आहे असे दर्शवित आहेत. त्याच प्रमाणे महसुल प्रकरणामध्ये देखील प्रतिवादी क्र.1 हे आज रोजी देखील वादींविरुध्द प्रकरणे चालवित आहेत. प्रतिवादींचेच कृत्य काल्पनिक स्वरुपात खरे आहे असे गृहित धरले तरी देखील त्यांनी जर न्यायालयीन डिक्री आधारे मिळकत हस्तांतरीत केली आहे अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्र.1 यांचे मिळकतीमध्ये कोणतेही हितसंबंध नसताना ते वादींविरुध्द महसुल प्रकरणे बिनधास्तपणे चालवित आहेत.

11] हे की, प्रतिवादी क्र.4 यांनी त्यांच्या हक्कात झालेल्या बनावटी डिक्रीचा फायदा घेत दुसऱ्या महसुली प्रकरणाच्या

कार्यवाही (Second Round of Litigation) मध्ये सुरु केले ज्यामध्ये की, वादी यांच्या नावाने पहिल्या महसुली प्रकरणाच्या कार्यवाही (First Round of Litigation) मध्ये अंतिम आदेशानुसार झालेला फेरफार क्र.3704 हा प्रतिवादी क्र.4 यांनी दुसऱ्या महसुली प्रकरणाच्या कार्यवाही (Second Round of Litigation) मध्ये आव्हानीत केला व त्यामध्ये ते तात्पुरत्या स्वरुपामध्ये यशस्वी झाले. कारण की, महसुली न्यायालय हे निष्कारणपणे प्रतिवादींनी आपसातील संगणमताने हस्तगत केलेल्या तडजोडीच्या कोर्ट डिक्रीला प्रभावित होऊन वादींच्या प्रकरणातील गुणवत्तेला संपुर्णपणे दुर्लक्षित करत आहेत. महसुल प्राधिकरणे ही सारासार विचार देखील करत नाहीत की, सदरच्या कोर्ट डिक्रीमध्ये कुठेही वादी यांना पक्षकार केलेले नाही. वादींच्या हक्कातील खरेदीखत आज रोजी पर्यंत कोणत्याही न्यायालयाने रद्द केलेले नाही.

12] हे की, प्रतिवादींनी आपसातील संगणमताने प्रकरणामध्ये अधिकाधिक गुंतागुंत निर्माण करण्याच्या वाईट हेतुने सदरच्या बनावटी डिक्री मा.दिवाणी न्यायालयाची फसवणुक करुन हस्तगत केलेल्या आहेत. दिवाणी न्यायालयासमक्षच दावा मिळकती बाबत वाद न्यायप्रविष्ट आहे, दावा मिळकतीबाबत वाद महसुल न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट आहे, वादींच्या हक्कातील खरेदीखत प्रतिवादींनी आव्हानीत केलेले असून ते आज रोजीपर्यंत रद्द झालेले नाही ही बाब प्रतिवादींना स्पष्टपणे माहिती असताना देखील प्रतिवादींनी अल्प कालावधीमध्ये कुटुंबातील अंतर्गत संगमणमताने तडजोडी करुन बनावटी हुकुमनामे हस्तगत केलेले आहेत व

सदरील हुकुमनाम्यामध्ये वादी हे पक्षकार नाहीत तसेच ते वादींच्या परस्पर मुद्दामहुन करुन घेतलेले आहेत त्यामूळे ते वादींवर बंधनकारक नाहीत अशी घोषणा करणे आवश्यक आहे.

13] हे की, वादीने प्रथमदर्शनी तिची केस सिध्द केलेली असून बॅलेन्स ऑफ कन्व्हेनिअन्स देखील वादीच्या हक्कात आहे, जर वादीच्या हक्कात तात्पुरत्या स्वरुपाचा मनाई हुकुमाचा आदेश पारीत झाला नाही तर वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल.

सोबत वादीचे शपथपत्र जोडत आहे.

**तरी विनंती की,**

तरी विनंती की, वादीचा एकतर्फा अंतरिम स्वरुपाचा तात्पुरत्या मनाई स्वरुपाचा अर्ज मान्य करुन आदेश पारित करण्यात यावा की, प्रतिवादी वा त्यांच्या वतीने इतर कुणीही वादींच्या मालकी व ताब्यातील वाद क्र.1 मधील वर्णनातील मिळकतीमध्ये दाव्याच्या अंतिम निर्णयापर्यंत कोणत्याही प्रकारे अडीहरकत व हस्तक्षेप करु नये तसेच प्रतिवादींनी दावा मिळकतीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण, विक्री, डिक्री व इतर कोणत्याही प्रकारे त्रयस्थ व्यक्तीचे हक्क व अधिकार कोणत्याही प्रकारे दावा मिळकतीमध्ये निर्माण करु नये.

तसेच प्रतिवादी क्र.1 ते 4 विरुध्द अंतरिम मनाई हुकुमाचा आदेश दाव्याच्या अंतिम निर्णयापर्यंत याप्रमाणे पारित करण्यात यावा की, प्रतिवादी यांनी दिवाणी दावा क्र.218/2016 व दिवाणी दावा क्र.48/2022 मधील तडजोडीचा व पर्यायाने डिक्री व आदेशाचा कोणत्याही प्रकारे वापर करु नये.

दिनांक : 24/ /25

वादी

नि.डा.अं

**गंगाबाई भ्र.रामजी कुंडगीर**
रा.बोथी ता.गंगाखेड जि.परभणी

**सत्यापन**

सत्यापित करण्यात येते की, उपरोक्त दाव्यातील मजकूर हा माझ्या माहिती व ज्ञानाप्रमाणे सत्य व बरोबर आहे, करिता आज रोजी परभणी येथे सत्यापित करण्यात येत आहे.

दिनांक : 24-6-25

वादी नि.डा.अं

**गंगाबाई भ्र.रामजी कुंडगीर**
रा.बोथी ता.गंगाखेड जि.परभणी

मार्फत

ॲड. [signature]
परभणी

**Noted & Registered**
**at Serial Number.....** 645/25
**Date:** 24/6/25

Exh.07

ORDER
- Seen & filed.

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.06.25 17:40:22 +0530

CJSD, Gangakhed.

# विद्यमान दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, गंगाखेड [redacted]
# न्यायालयात

दिवाणी दावा क्रमांक /2025

**गंगाबाई भ्र.रामजी कुंडगीर**
**विरुध्द**
**प्रकाश पिता गोपाळराव पुराणिक व इतर** [redacted]

वाद : तात्पुरता मनाई हुकुमाकरिता.

**शपथपत्र**

मी, **गंगाबाई भ्र.रामजी कुंडगीर**, वय : 72 वर्षे, व्यवसाय : घरकाम व शेती, रा.बोथी ता.गंगाखेड जि.परभणी शपथपुर्वक निवेदन सादर करते की,

हे की, निवेदिकेने प्रतिवादी विरुध्द तात्पुरत्या स्वरुपाचा मनाई हुकुम मिळणे करिता अर्ज सादर केलेला आहे.

हे की, निवेदिकेने दाखल केलेल्या अर्जातील मजकूर हा या शपथपत्राचा भाग समजण्यात यावा.

हे की, निवेदिकेने दाखल केलेल्या अर्जातील मजकूर हा सत्य व बरोबर आहे.

करिता हे शपथपत्र.

दिनांक : 24-6-25

निवेदिका
नि.डा.अं

**गंगाबाई भ्र.रामजी कुंडगीर**
रा.बोथी ता.गंगाखेड जि.परभणी

**सत्यापन** ***EXECUTANT***

सत्यापित करण्यात येते की, उपरोक्त शपथपत्रातील मजकूर हा माझ्या माहिती व ज्ञानाप्रमाणे सत्य व बरोबर आहे, करिता आज रोजी परभणी येथे सत्यापित करण्यात येत आहे.

दिनांक : 24-6-25

निवेदिका
नि.डा.अं

**गंगाबाई भ्र.रामजी कुंडगीर**
रा.बोथी ता.गंगाखेड जि.परभणी
***EXECUTANT***

NOTARY * GOVERNMENT OF INDIA * SEAL R. M. GHULE Area Parbhani District Reg.No.31467 Exp. Dt. 09/01/2030 NOTARIAL

NOTARY SEAL
R. M. GHULE
Area Parbhani District
Reg.No.31467
Exp. Dt. 09/01/2030
GOVERNMENT OF INDIA

AFFIDA...

Sworn before me on the...24 ...20
by...
Who has been identified by...Adv. S.M. ...
Who is Personally by Known to me & Whose
Signature here to appended.

**EXECUTANT**

**IDENTIFIED**

**BEFORE ME**

**R. M. GHULE**
ADVOCATE & NOTARY
(Appointed by Govt. of India)
Parbhani Dist.

**Noted & Registered**
**at Serial Number.** 645
**Date:** 24/6/...

Exh.08

# विद्यमान दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, गंगाखेड यांचे न्यायालयात

दिवाणी दावा क्रमांक /2025

ORDER
Seen & filed.
Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.06.25 17:40:37 +0530
CJSD, Gangakhed.

**गंगाबाई भ्र.रामजी कुंडगीर**

**विरुध्द**

**प्रकाश पिता गोपाळराव पुराणिक व इतर**

वाद : घोषणा व मनाई हुकुमा करिता.

**महोदय,**

वरिल प्रकरणात वादी अज्ञान वादी क्र.4 विरुध्द अपाक मार्फत दावा दाखल करण्याच्या परवानगी करिता अर्ज सादर करित आहे.

1] हे की, वादी यांना प्रतिवादी क्र.1 ते 3 व अज्ञान प्रतिवादी क्र.4 यांच्या विरुध्द घोषणे करिता व मनाई हुकुमा करिता दावा दाखल करावयाचा आहे.

2] हे की, आज रोजी मिळकत हि अज्ञान प्रतिवादी क्र.4 याच्या नावाने नोंद असून त्याला प्रकरणात पक्षकार करणे आवश्यक आहे. अज्ञान प्रतिवादी क्र.4 याने अपाक सख्खी आई हिच्या वतीने प्रतिवादी क्र.3 यांच्या विरुध्द दिवाणी दावा क्र.48/2022 दाखल केलेला होता. त्यानुसार प्रतिवादी क्र.4 यास मिळकतीचे हस्तांतरण झालेले आहे.

3] हे की, अपाक हि अज्ञानाची सख्खी आई असून तिच्या हिताकरिता कार्यवाही करते. त्या कारणाने अज्ञाना विरुध्द त्याच्या

अपाक मार्फत दावा दाखल करण्याची परवानगी देणे आवश्यक आहे.

**तरी विनंती की,**

तरी विंनती की, प्रतिवादी क्र.4 अज्ञान सदाशिव याच्या विरुध्द अपाक मार्फत दावा दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी.

दिनांक : 24-6-25

वादी

नि.डा.अं

**गंगाबाई भ्र.रामजी कुंडगीर**

रा.बोथी ता.गंगाखेड जि.परभणी

**सत्यापन**

सत्यापित करण्यात येते की, उपरोक्त अर्जातील मजकूर हा माझ्या माहिती व ज्ञानाप्रमाणे सत्य व बरोबर आहे, करिता आज रोजी परभणी येथे सत्यापित करण्यात येत आहे.

दिनांक : 24-6-25

वादी

नि.डा.अं

**गंगाबाई भ्र.रामजी कुंडगीर**

रा.बोथी ता.गंगाखेड जि.परभणी

Noted & Registered
at Serial Number..45/25
Date: 24/6/2025

Exh.09

ORDER
Seen & filed.
Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.06.25 17:40:49 +0530
CJSD, Gangakhed.

# विद्यमान दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, गंगाखेड [redacted]
# न्यायालयात

दिवाणी दावा क्रमांक /2025

**गंगाबाई भ्र.रामजी कुंडगीर**

**विरुध्द**

**प्रकाश पिता गोपाळराव पुराणिक व इतर** [redacted]

वाद : तात्पुरता मनाई हुकुमाकरिता.

## शपथपत्र

मी, **गंगाबाई भ्र.रामजी कुंडगीर**, वय : 72 वर्षे, व्यवसाय : घरकाम व शेती, रा.बोथी ता.गंगाखेड जि.परभणी शपथपुर्वक निवेदन सादर करते की,

हे की, निवेदिकेने प्रतिवादी क्र.4 हा अज्ञान असून त्याच्यावतीने अपाक मार्फत दावा चालविण्या करिता अर्ज सादर केलेला आहे.

हे की, निवेदिकेने दाखल केलेल्या अर्जातील मजकूर हा या शपथपत्राचा भाग समजण्यात यावा.

हे की, निवेदिकेने दाखल केलेल्या अर्जातील मजकूर हा सत्य व बरोबर आहे.

करिता हे शपथपत्र.

दिनांक : 24-6-25

निवेदिका

नि डा अं

**गंगाबाई भ्र.रामजी कुंडगीर**
रा.बोथी ता.गंगाखेड जि.परभणी
**EXECUTANT**

**सत्यापन**

सत्यापित करण्यात येते की, उपरोक्त शपथपत्रातील मजकूर हा माझ्या माहिती व ज्ञानाप्रमाणे सत्य व बरोबर आहे, करिता आज रोजी परभणी येथे सत्यापित करण्यात येत आहे.

दिनांक : 24-6-25

निवेदिका

डा.अं

**गंगाबाई भ्र.रामजी कुंडगीर**
रा.बोथी ता.गंगाखेड जि.परभणी
**EXECUTANT**

NOTARY SEAL R. M. GHULE Area Parbhani District Reg.No.31467 Exp. Dt. 09/01/2030 GOVERNMENT OF INDIA NOTARIAL

NOTARY SEAL
R. M. GHULE
Area Parbhani District
Reg.No.31467
Exp. Dt. 09/01/2030
GOVERNMENT OF INDIA

**AFFIDAVIT**

Sworn before me on the..24....day of Ju20..
by..............................
Who has been identified by..Adv.......S. M. Patil
Who is Personally by Known to me & Whose
Signature here to appended.

नि. डा अं

***EXECUTANT***

***BEFORE ME***

**R. M. GHULE**
ADVOCATE & NOTARY
(Appointed by Govt. of India)
Parbhani Dist.

***IDENTIFIED***

**Noted & Registered**
**at Serial Number** 646/24
**Date:** 24/6/2024

Exhibit No. Exh.02

# VAKALATNAMA

IN THE COURT OF HON'BLE C.J.S.D AT ~~PARBHANI~~ GANGAKHED

_______________ No _______ /2025

| | |
|---|---|
| Gangabai | Appellant / Applicant / Complainant / Petitioner / Plaintiff / D.H. |

VERSUS

| | |
|---|---|
| Prakash & oth | Respondent / Opponent / Accused / Defendant / Non - Petitioner / Non-Applicant / J.D. |

CLAIM / CHARGE : - Declaration

I / We the undersigned

Gangabai w/o Ramti Kundgir
Age 72 years. occu H.H.
R/o Bothi Ta Gangakhed Dist
Parbhani

ORDER
~~Seen & filed.~~
Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.06.25 17:40:59 +0530
CJSD, Gangakhed.

in the said matter hereby appoint.

Above named hereby appoint & authorize

**Adv. MADAN JIJARAO BOBADE**
**B.Sc, LL.B., LL.M.**
**Enrol. No. MAH/3331/2009**

to appear, act & Plead on my / our behalf in the above matter and to conduct, prosecute (defind) all interlocutory and miscellaneous proceeding relating thereto.

In witness whereof / We signed below this _______________ day of _______________ in the year Two Thousand _______________

Accepted & filed on 24 / 6 /2025

I am /I am not the member of the Maharashtra & Goa, Advocates Welfare fund and I have affixed the required stamp.

Signature of Client

**Adv. M.J. BOBADE**
Raigad Nager,Old Pedgaon Road,
Parbhani - 431 401
Mob. No.:7588155501, 9096622122
email ID: advmadanbobade@gmail.com

IN THE COURT OF HON'BLE C.J.S.D. AT GANGAKHED AT

Case No.: /2025

Exh.03

Gangabai V/s Prakash & oth

Claim/Charge Declaration

# ADDRESS MEMO

Gangabai w/o Ramji Kundgir
R/o Bothi Tq Gangakhed
Dist. Parbhani

ORDER
Seen & filed.
Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.06.25 17:41:09 +0530
CJSD, Gangakhed.

Date : 24-6-25

Submitted by

# VERIFICATION

It is Verified that the above address is my/our persent permanent address hence verified today at Parbhani.

Date : 24-6-25

**Submitted by**

**ADV. MADAN J. BOBADE**
B.Sc., LL.B. LL.M.
**Raigad Nagar, Parbhani.**
**Mob.: 9096622122**
**email ID: advmadanbobade@gmail.com**

Exh.04

# विद्यमान दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, गंगाखेड यांचे न्यायालयात

दिवाणी दावा क्रमांक /2025

**गंगाबाई**

**विरुध्द**

**प्रकाश व इतर**

वाद : घोषणे करिता.

## कागदपत्रांची यादी

ORDER
Seen & filed.
Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.06.25 17:41:23 +0530
CJSD, Gangakhed.

| अ.क्र. | कागदपत्राचे विवरण | शेरा |
|---|---|---|
| 1 | खरेदीखत क्र.572/2009 दि.25/03/2009 | छायांकित प्रत |
| 2 | गट क्र.218 मौ.राणीसावरगाव ची 7/12 | प्रमाणित प्रत |
| 3 | दिवाणी दावा क्र.218/2016 मधील रोजनामा | प्रमाणित प्रत |
| 4 | दिवाणी दावा क्र.218/2016 मधील हुकुमनामा | प्रमाणित प्रत |
| 5 | दिवाणी दावा क्र.218/2016 मधील निशाणी क्र.1 | प्रमाणित प्रत |
| 6 | दिवाणी दावा क्र.48/2022 मधील निशाणी क्र.1 | प्रमाणित प्रत |
| 7 | दिवाणी दावा क्र.48/2022 मधील रोजनामा | प्रमाणित प्रत |
| 8 | दिवाणी दावा क्र.48/2022 मधील हुकुमनामा | प्रमाणित प्रत |
| 9 | मा.विभागीय आयुक्त यांचेकडील प्रकरण क्र.168/2022 मधील आदेश दि.09/05/2022 | छायांकित प्रत |
| | | |
| | | |
| | | |

दिनांक : 24-6-25

मार्फत

अ‍ॅड.मदन बोबडे
परभणी

वादी

गंगाबाई कुंडगीर